**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 07.01.2025** **वार - मंगळवार**

---

**एचएमपीव्ही**

एचएमपीव्ही विषाणूच्या संसर्गाचा सामना करण्यासाठी राज्य सरकारच्या सर्व यंत्रणा, आरोग्य व्यवस्था सज्ज आहे, अशी ग्वाही राज्य सरकारनं दिली आहे. एचएमपीव्ही विषाणू धोकादायक नाही, त्यामुळे भीती बाळगण्याची आवश्यकता नसल्याचं राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ आणि सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितलं. एचएमपीव्ही विषाणू संसर्गाच्या पार्श्वभूमीवर दोन्ही मंत्र्यांनी आज मुंबईत मंत्रालयात पत्रकारांशी संवाद साधला. दरम्यान एचएमपीव्ही संसर्गाच्या अनुषंगानं पुणे महापालिकेने आरोग्य यंत्रणा सतर्क करत उपाययोजना सुरू केल्या आहेत. रुग्णांच्या उपचारासाठी नायडू रुग्णालयात 50 खाटांचा विलगीकरण कक्ष तयार केला आहे. हिवाळ्यामध्ये ताप, खोकला येण्यासह अशक्तपणा, उलट्या होणे, श्वसनाला त्रास अशी लक्षणं असतील तर डॉक्टरांच्या सल्ल्याने रुग्णालयात दाखल व्हावं, असं महापालिकेनं म्हटलं आहे. महापालिकेने अजून कोणाचेही नमुने प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठवलेले नाहीत; लोहगाव विमानतळावरही अद्याप प्रवाशांची तपासणी सुरु केलेली नाही. पुढच्या बैठकीत याबाबतचा निर्णय घेतला जाईल. या विषाणू संसर्गाबाबत घाबरू नये; पुणे महापालिकेची आरोग्य यंत्रणा तयार आहे, अशी ग्वाही महापालिका आरोग्य प्रमुख डॉक्टर नीना बोराडे यांनी दिली आहे.

**डूडी-पत्रकार परिषद**

पुणे जिल्ह्यात विविध विकास कामे हाती घेण्यात येणार असून, पायाभूत सेवांमध्ये समावेश असणाऱ्या रिंग रोड प्रकल्पाचं काम लवकरच सुरू करणार असल्याचं, जिल्हाधिकारी डूडी यांनी आज पत्रकारपरिषदेत सांगितलं. या प्रकल्पाच्या पश्चिम भागात 90 टक्के तर पूर्व भागात 82 टक्के भू संपादनाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे, असं ते म्हणाले. पुणे जिल्ह्याला  एकात्मिक पर्यटन केंद बनवण्यासाठी पर्यटन प्रकल्प राबवण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं. ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्र मजबूत करण्यासाठी स्मार्ट पीएचसी उपक्रम हाती घेण्यात येणार असून, ग्रामीण भागातील नागरिकांना जिल्हाधिकारी कार्यालयात चकरा मारायला लागू नये यासाठी ई-कार्यालय शंभर टक्के क्षमतेने सुरू करणार असल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली.

**भैय्याजी जोशी**

यंदाचं 2025 हे वर्ष सहकार वर्ष म्हणून साजरं करण्यात येत आहे. त्या निमित्तानं जनता सहकारी बँकेच्या वतीनं काल पुण्यात ‘सहकार आणि सामाजिक योगदान’ या विषयावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य भैय्याजी जोशी यांचं व्याख्यान आयोजित करण्यात आलं होतं. सहकाराच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांना आर्थिक साक्षर करणं, त्यांच्या प्रगतीसाठी सातत्यानं प्रयत्नशील राहणं आवश्यक असल्याची गरज जोशी यांनी यावेळी व्यक्त केली.

**pcmc**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत शहराच्या हद्दीतील 44 झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या सुमारे 31400 कुटुंबांचं सर्वेक्षण पूर्ण केलं आहे. या सर्वेक्षणामध्ये 18 ते 35 वयोगटातील 18 हजार युवक असल्याची माहिती महापालिकेला मिळाली. या युवकांचं शिक्षण, कौशल्य आणि करिअर याबाबत महत्त्वपूर्ण माहितीही महापालिकेने गोळा केला आहे. या माहितीवर आधारित कौशल्य विकास आणि रोजगार कार्यक्रम महापालिका तयार करणार आहे.

**पुणे महापालिका**

सौरऊर्जा, गांडूळ खत आणि रेन वॉटर हार्वेस्टिंगची सुविधा असलेल्या मिळकतींना पुणे महापालिका अनेक वर्षे मिळकत करात सवलत देते. ही सवलत आगामी देयकातही मिळविण्यासाठी मिळकतधारकांनी नव्याने अर्ज करावेत, असे आदेश महापालिकेने काढले आहे. त्यावर या सवलतीसाठी अर्ज नव्याने करण्याची आवश्यकता वाटत नाही. त्यामुळे या निर्णयाचा फेरविचार करावा, अशी मागणी माजी नगरसेवक उज्वल केसकर यांनी महापालिका आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांच्याकड केली आहे.

**कारवाई**

पुणे शहरात अस्वच्छता पसरवणाऱ्या 52 हजार 405 बेशिस्त पुणेकरांवर गेल्या वर्षभरात पुणे महापालिकेच्या घनकचरा विभागानं दंडात्मक कारवाई केली आहे. यात 3 कोटी 28 लाख 187 रुपयांचा दंड वसूल केला आहे. गेल्या तीन वर्षांतील ही सर्वाधिक दंड वसुली आणि कारवाईची संख्या आहे अशी माहिती महापालिकेच्या घनकचरा विभागाचे प्रमुख संदीप कदम यांनी दिली.

**मांजाबंदी**

संक्रांती सणानिमित्त पतंग उडवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या नायलॉन मांजा विक्रीवर बंदी असताना छुप्या पद्धतीने मांजा विक्री करणाऱ्या दोघांना पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने पकडलं आहे. त्यांच्याकडून नायलॉन मांजाचे 50 रीळ जप्त करण्यात आले आहेत. बिबवेवाडी आणि धानोरी भागात ही कारवाई करण्यात आली. जप्त केलेल्या मांजाची किंमत दहा हजार रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**क्रीडा**
पुणे जिल्हा बॅडमिंटन संघटनेच्या मान्यतेने जिल्हा सुपर-500 मानांकन बॅडमिंटन स्पर्धा उद्यापासून सुरु होणार आहेत. चैतन्य खरात आणि अस्मिता शेडगे यांना आपापल्या गटाच्या एकेरीमध्ये अग्र मानांकन मिळालं  आहे. अर्चित खांदेशे आणि अग्रिम रणा यांना अकरा वर्षाखालील गटात, जतिन सराफ आणि कायरा रैना यांना 13 वर्षाखालील गटात माधव कामत आणि शरयू रांजणे यांना 15 वर्षाखालील गटात मानांकन देण्यात आलं आहे.

**हवामान**
पुणे आणि परिसरात आज किमान तापमान 12 पूर्णांक 7 दशांश अंश सेल्सियस नोंदवण्यात आलं. उद्या हवामान कोरडं राहून किमान तापमान 13 अंशांच्या आसपास राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं व्यक्त केला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**